# श्री. वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ
## SHRI. VASANTRAO NAIK GOVT. MEDICAL COLLEGE, YAVATMAL –445001

जा.क्र.शरीररचनाशास्त्र / / २०२६ दिनांक : / / २०२६

## मरणोत्तर देहदान
## शरीरचनाशास्त्र विभाग

वैद्यकीय शिक्षण व संशोधनाकरीता आपण देहदान करण्याचा आपला मनोदय अभिनंदनीय व स्तुत्य आहे. वैद्यकीय शिक्षणा करीता मिळालेल्या मृतदेहाचा योग्य तो आदर राखला जातो.

सोबत पाठवित असलेला फॉर्म शक्य झाल्यास पासपोर्ट साईज फोटो, दोन साक्षीदारांची सही तसेच आपल्या जवळच्या किमान दोन नातेवाईकांच्या सहमतीपत्रावर स्वाक्षरी घेवुन पाठवावा. मृत्युनंतर शक्य तितक्या लवकर मृतदेहावर एक रासायनिक प्रक्रिया करणे आवश्यक असते. म्हणुन आपल्या नातेवाईकाचे मृत्युनंतर मुळ दाखल्यासह मृतदेह महाविद्यलयाच्या स्वाधिन करणे आवश्यक असते. हया प्रक्रियेत वेळ जावू नये म्हणुन खाजगी किंवा भाडोत्री वाहनाने, किमान प्रचलीत भाडे देवुन मृतदेह आणता येईल. त्याकरीता अधिष्ठता/प्राध्यापक शरीररचनाशास्त्र हयांची दूरध्वनीवरुन परवानगी घ्यावी.

आपणास दिर्घायुष्य लाभो ही प्रार्थना

टीपः- सोबत असलेल्या सहपत्रांची देहदात्यांनी व त्यांचे नातेवाईकांनी आवश्यक नोंद घ्यावी.

# देहदानाची पध्दत

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ येथील शरीरचनाशास्त्र विभागात विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकरीता आणि ईतर वैद्यकीय संशोधनाकरीता मृतदेह ऐच्छीक पणे स्विकारले जातात.

त्यासाठी खालील बाबींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

१. मृत्युनंतर आपला देह दान केला जावा अशी इच्छा असणाऱ्याला कुठल्याही व्यक्तीस सोबत असलेल्या फॉर्म भरुण दयावा लागतो. हा फॉर्म शरीरचनाशास्त्र विभागातुन कार्यालयीन वेळेत तसेच पोस्टद्वारे देखील उपलब्ध होउ शकेल. काही कारणांमुळे हा फॉर्म भरला गेला नसेल परंतु देहदात्या व्यक्तीने देहदानची इच्छा आपल्या कुटूंबियात प्रकट केली असेल तर मृत्युनंतर देखील जवळचे नातेवाईक ऐनवेळेवर मयत व्यक्तीच्याा वतीने फॉर्म भरुण देहदान करु शकतात (हया करीता वेगळा प्रोफॉर्मा शरीररचनाशास्त्र विभागात उपलब्ध आहे.)

२. विहित नमुन्यातील फॉर्म भरतांना देहदात्यांने आपला एक पासपोर्ट साईज फोटो फॉर्म वर लावावा. नमुद केल्यानुसार जवळच्या नातेवाईकांची (आई,वडील,पती,पत्नी,मुलगा,मुलगी, किंवा ईतर) नावे लिहुन त्यांच्या स्वाक्षरी साक्षीदार म्हणुन फॉर्म वर घेणे अनिवार्य आहे. हया सर्व बाबींची पुर्तता झालेला फॉर्म विभागात दिल्यानंतर विभागाच्या रजिस्टर मध्ये हयांची नोंदणी होईल व तो क्रमांक आपणास कळविण्यात येईल. अश्या तऱ्हेने नोंद झालेल्या फॉर्मची झेराक्स प्रत आपल्या कुटुंबियाजवळ देऊन ठेवावी.

३. मृतदेह विभागात आणते वेळी देहदात्याचे रजिस्टर्ड मेडीकल प्रॅक्टीशनर नोंदणीकृत डॉक्टराचे मृत्युचे प्रमाणपत्र( Death of Certificate) सादर करणे आवश्यक आहे देहदात्याचे मृत्युनंतर नातेवाईकांनी दुरध्वनीद्वारे तात्काळ वैद्यकीय महाविद्यालयाच्या शरीररचनाशास्त्र विभागात कार्यालयीन वेळेत तथा कार्यालयीन वेळेव्यतीरीक्त वैद्यकीय उपअधिक्षक किंवा अपघात विभागातील वैद्यकीय अधिकारी (C.M.O) हयांच्याशी संपर्क साधावा.

४. मृत्युचे कारण खाली नमुद केल्या पैकी असेल तर मृतदेह स्विकारल्या जाणार नाही.

१. संसर्ग जन्य रोग उदा. गुप्त रोग (एडस, सिफीलीस,) रक्तातील जंतु संसर्ग (सेप्टीसिमिया), रक्ताचा कावीळ (हिपॅटाटीस - बी ), संक्रमीत क्षयरोग (ॲक्टीव्ह टी.बी.), ॲक्टीव्ह लेप्रसी कृष्ठरोग

२. शरीरावर जखमा आसल्यास उदा. बेडसोअर्स, गॅगरीन इ.

३. अपघाती मृत्यु असल्यास

४. मेडीको- लीगल केस असल्यास (पोलिस केस)

टीप:- नोंदणीकृत डॉक्टरांचे मृत्युबाबतचे मृत्युचे कारण स्पष्ट असलेले प्रमाणपत्र असणे अनिवार्य राहील अन्यथा देहदान स्विकारण्यात येणार नाही.

# (महाराष्ट्र शासन)

शरीररचनाशास्त्र विभाग,

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ. - ४४५००१

मरणोत्तर देहदान करु इच्छिणाऱ्या व्यक्ती आणि त्यांच्या नातेवाईकासाठी आवश्यक असलेली माहीती

देहदान कायदा १९७६ (सुधारीत ) मुंबई ॲनाटॉमी ॲक्ट ५ (ब) कोणाही व्यक्तीने त्याच्या जीवंतपणी लेखी अथवा तोंडी देहदानाची इच्छा व्यक्त केली असेल किंवा त्या व्यक्तीच्या निधनानंतर नातेवाईकांची इच्छा असेल तर मृतव्यक्तीचा मृतदेह अधिकृत वैद्यकीय संस्थानात दान करता येतो. त्या करीता न्यायालय किंवा पोलीसाची परवानगी लागत नाही. (कॉरोनर कोर्ट परीपत्रक दिनांक २२ जानेवारी १९८७)

मृतदेहाचा उपयोग वैद्यकीय महाविद्यालयात विद्यार्थाच्या शिक्षणासाठी आणि संशोधनासाठी केला जातो. देहदान हे फार मोठे सामाजीक कार्य आहे.

देहदानाची इच्छा असणाऱ्या व्यक्तीसाठी नियम...

१. प्राध्यापक व विभाग प्रमुख, शरीररचनाशास्त्र विभाग शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ यांचेकडुन इच्छापत्राचे दोन फॉर्म मागवावे. त्यापैकी एक फॉर्म स्वतः भरुण आणावा अथवा पोस्टाने पाठवावा आणि दुसरा फॉर्म भरुण आपल्या नातेवाईकाजवळ त्यांच्या माहितीसाठी ठेवावा.
२. इच्छापत्र हे नातेवाईकावर बंधनकारक नाही.
३. इच्छापत्र भरलेले नसेल तरीही देहदान करता येते पण नातेवाईकांस आपली ईच्छा लेखी असावी म्हणुन इच्छापत्र भरावे.
४. आपल्या श्रध्देनुसार धार्मीक विधी करुनही आपण देहदान करु शकता
५.

**देहादात्याच्या निधनानंतर मृताच्या नातेवाईकांचे कर्तव्य...**

१. मृत व्यक्तीने इच्छापत्र भरले असेल तर मृतांची अंतिम इच्छा पूर्ण करणे हे आपले कर्तव्य समजावे.
२. निधनानंतर ताबडतोब जवळच्या फॅमिली डॉक्टरांना बोलावून मृत्युच्या काराणासह मृत्युचा दाखल घ्यावा. त्यांची एक प्रत देहदानाच्या वेळेस शरीररचनाशास्त्र विभागास सादर करावी. तसेच मृत्यु नोंद प्रमाणपत्राची एक प्रत हया कार्यालयास सादर करावी.
३. मृतदेह कार्यालयीन वेळेव्यतिरीक्त आणल्यास आपण अपघात विभागातील वैद्यकीय अधिकारी / अधिक्षक / निवासी वैद्यकीय अधिकारी यांना लेखी विनंती अर्ज सादर करुन तो मृतदेह कार्यालय सुरु होईपर्यत (६.०० वाजेपर्यत ) नऊ वाजेपर्यत शवगारातील शीतपेटीत ठेवावा.

४. मृत्युनंतर शक्यतोर सहा तासाच्या आत मृतदेह वैद्यकीय महाविद्यालयात आणावा कारण उशीर झाल्यास मृतदेह देहदानाच्या उपयोगी राहणार नाही.

५. बाहेगावावरुन मृतदेह आणण्यासाठी शासकीय नियमाप्रमाणे गाडीच्या चालकास त्याचा वाहतुक खर्च दिला जाईल. गाडीच्या चालकाकडे त्यासाठी छापील पावती असणे गरजेचे आहे.

६. मृतदेह ठेवतांना व उतरवितांना कर्मचाऱ्यास मदत करावी. तीच तुमची शेवटची सेवा समजावी.

७. मृतदेह आणतांना फक्त जबाबदार व्यक्तींनीच बरोबर यावे.*

८. देहदानानंतर आपणस प्रमाणपत्र दिले जाईल.

९. मृत्यु पावलेल्या व्यक्तीचे आणि पोलीसांच्या ताब्यात असलेले मृतदेह देहदानाकरिता शरीररचनाशास्त्र विभागात स्वीकारले जाणार नाहीत. याची नोंद घ्यावी.

प्राध्यापक व विभाग प्रमुख,<br>
शरीररचनाशास्त्र विभाग<br>
श्री.व.ना. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यवतमाळ

# देहदात्यांनी भरावयाचे इच्छापत्र

नांव:

पत्ता:

फोन क्र.:

दिनांक:

फोटो

प्रति,

मा.अध्यक्ष,

मरणोत्तर देहदान समिती व.ना.शा.वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,यवतमाळ.

विषय: मरणोत्तर देहदान करण्याबाबत.

मा. महोदय,

माझ्या मृत्युनंतर माझे संपूर्ण शरीर शैक्षणिक, संशोधन अथवा तत्सम कार्याकरीता दान करण्याची माझी इच्छा आहे. आपल्या फॉर्म मध्ये नमुद केल्याप्रमाणे माझ्या जवळच्या नातेवाईकांनी सदर इच्छापत्र स्वाक्षरी करुन दिले आहे. तरी आपणास विनंती करण्यात येते की, माझ्या मृत्युनंतर माझा मृतदेह संशोधन, शैक्षणिक/विच्छेदन वा इतर कोणत्याही आवश्यक हेतु करता वापरण्यास माझी हरकत नाही.

धन्यवाद.

आपला/ आपली विश्वासू

स्वाक्षरी व नांव

सदर इच्छापत्र आम्हा सर्वाच्या उपस्थीतीत लिहुन देण्यात आले आहे. सदर व्यक्तीच्या देहदानासआमचा कोणताही आक्षेप नाही. तसेच त्यांच्या मरणोत्तर देहदानानंतर त्यांचा देह शैक्षणीक अथवा इतर कार्यासाठी वापरण्यास माझी हरकत नाही.

| अ. क्र | नांव | देहदात्यांशी नाते | पत्ता फोन नंबर | सही |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

## मृतकानी इच्छापत्र आधी भरलेले नसल्यास नातेवाईकां तर्फे वेळेवर भरण्याचा फॉर्म :

मृतकाचा पासपोर्ट फोटो

नाव :

पत्ताः

दिनांक :

प्रति,

मा. प्राध्यापक व विभाग प्रमुख,
शरीररचनाशास्त्र विभाग
श्री.व.ना.शा.वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ.

विषय :- मरणोत्तर देहदान करणेबाबत...

मा. महोदय,

माझे / माझी------------ चे मृत्युनंतर त्याचा / तीचा मृतदेह वैद्यकीय शिक्षण व संशोधनाकरीता दान करण्यास माझी संपुर्ण सहमती व संमती आहे. आपल्या फॉर्म मध्ये नमुद केल्यानुसार मयताच्या जवळच्या नातेवाईकांनी सदर इच्छापत्र स्वाक्षरी करून दिले आहे. तरी आपणास विनंती की, सदर मृतदेह शिक्षण संशोधनासाठी वापरण्यास माझी हरकत नाही.
धन्यवाद.

आपला/आपली विश्वासू
नाव/स्वाक्षरी
मयताशी असलेले नाते
फोन क्रमांक :-

सदरील इच्छापत्र आम्हां सर्वाच्या उपस्थितीत लिहुन देण्यात आले आहे. सदर व्यक्तीच्या देहदानास आमचा कुठलाही आक्षेप नाही. तसेच त्यांच्या देहदानानंतर त्यांचा देह शैक्षणीक किंवा इतर कार्यासाठी वापरण्यास आमची काहीही हरकत नाही.

| अ. क्र. | नांव | मृतकाशी नाते | पत्ता/फोन क्र. | स्वाक्षरी/सही |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |